# प्रेसनोट

दिनांक १०/०८/२०२०

## ग्रामपंचायत कार्यालय बळीरामपुर, नांदेड येथील ग्रामसेवक श्री. गोविंद माचनवाड यांना ८,०००/- रुपये लाचेच्या रक्कमेस लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड यांनी रंगेहाथ पकडले.

दिनांक ०६/०८/२०२० रोजी यातील तक्रारदार यांनी तक्रार दिली की, ''यातील लोकसेवक गोविंद माचनवाड हे तक्रारदार यांना वाटर प्लांट टाकण्याकरीता ग्रामपंचायत कार्यालयाकडुन नाहरकत प्रामणपत्र देण्यासाठी १०,०००/- रु लाचेची मागणी करीत आहेत''.

तक्रारदार यांचे तक्रारीच्या अनुषंगाने लाचलुचत प्रतिबंधक विभाग, नांदेड कार्यालयाकडुन दिनांक ०७/०८/२०२० रोजी पंचासमक्ष केलेल्या लाच मागणी पडताळणी मध्ये लोकसेवक माचनवाड यांनी तक्रारदार यांचेकडे उपरोक्त कारणासाठी १०,०००/- रु. लाचेची मागणी करुन तडजोडीअंती ८,०००/- रू. लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

त्यावरून आज दिनांक १०/०८/२०२० रोजी एस.बी.आय. बँक, संभाजी चौक सिडको, नांदेड परिसरात लावण्यात आलेल्या सापळयामध्ये लोकसेवक माचनवाड यांनी तक्रारदार यांचेकडुन ८,०००/- रू. लाचेची रक्कम स्विकाल्यानंतर त्यांना रंगेहात पकडण्यात आले असून आरोपी लोकसेवक गोविंद गुणाजी माचनवाड , वय ४० वर्ष, ग्रामसेवक ग्रमपंचायत कार्यालय बळीरामपुर ता. जि. नांदेड रा. सुनिल नगर, बळीरामपुर, नांदेड यांचे विरूध्द पोलीस स्टेशन नांदेड ग्रामिण येथे भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालु असुन सदर गुन्हयाचा तपास पोलीस निरीक्षक शेषेराव नितनवरे, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड हे करीत आहेत.

सदरची सापळा कार्यवाही पोलीस अधिक्षक श्रीमती कल्पना बारवकर, अपर पोलीस अधीक्षक श्रीमती अर्चना पाटील, पोलीस उप अधिक्षक श्री. विजय डोंगरे, यांच्या मार्गदर्शनाखाली, पोलीस निरीक्षक शेषेराव नितनवरे, पोना. हनमंत बोरकर, किशन चिंतोरे, एकनाथ गंगातिर्थ, नरेंद्र बोडके, अनिल कदम यांनी पार पाडली आहे

तरी सर्व नागरीकांना अवाहन करण्यात येते की, शासकीय अधिकारी/कर्मचारी हे शासकीय काम करण्यासाठी लाचेची मागणी करीत असल्यास तसेच त्यांचे लाचेच्या मागणीचे मोबाईल फोनवर लोकसेवक यांचे एसएमएस किंवा व्हिडीओ, ऑडीओ क्लिप असल्यास, भ्रष्टाचार संबधाने कांही माहिती असल्यास किंवा माहिती अधिकारात शासकीय अधिकारी/कर्मचारी यांनी शासकीय निधीचा भ्रष्टाचार केला असेल तर खालील कंमाकावर संपर्क करावा.

१) टोलफ्री हेल्पलाईन कंमाक :- १०६४ (२) कार्यालयाचा फोन कंमाक ०२४६२-२५३५१२
३) श्री विजय डोंगरे, पो.उप अधि.यांचा मोबाईल कंमाक ८९७५७६९९१८

Website :- www.acbmaharashtra.gov.in, Mobile App :- www.acbmaharashtra.net
Facebook Page :- www.facebook.com/MaharashtraACB

कार्यालय,पोलीस उप अधिक्षक ला.प्र.वि.नांदेड.युनिट

( विजय डोंगरे )
पोलीस उप अधिक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड.

मा.संपादक, दैनिक ...........................................,
कृपया आपल्या लोकप्रिय दैनिकात सदर प्रेसनोट प्रसिध्द करावी.

Scanned by CamScanner